# प्रकरण III

# संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन

# प्रकरण III

# संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन

## 3.1 राज्यस्तरीय विधिविधानाची चौऱ्याहत्तराव्या संविधान सुधारणा अधिनियमासोबत तुलना

भारताच्या संविधानात, संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम**,** 1992 ने विनिर्देशपूर्वक नगरपालिकांसाठी भाग IXए चा समावेश केला. त्यात अनुच्छेद 243पी ते 243झेडजी यांचा समावेश होता. तद्नुसार, महाराष्ट्र शासनाने नव्याने भाग IXए च्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी, तीनही अधिनियमात म्हणजेच (i) मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888; (ii) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 आणि (iii) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 यामध्ये यथोचित सुधारणा केल्या.

संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियमातील तरतुदी आणि तद्नरूप तीनही नगरपालिका अधिनियमातील तरतुदींची तुलना **तक्ता 3.1** मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता 3.1: राज्य विधिविधानाची संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 यातील तरतुदींबरोबर केलेली तुलना**

| अ.क्र. | भारताच्या संविधानातील तरतुदी | भारताच्या संविधानातील तरतुदींनुसार आवश्यकता | भारताच्या संविधानातील तरतुदींचे अनुपालन करणाऱ्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888/महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949/महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 आणि इतर अधिनियमातील तरतुदी |
|---|---|---|---|
| 1 | अनुच्छेद 243क्यु | **नगरपालिका गठन करणे:** ह्यात तीन प्रकारच्या नगरपालिका प्रस्थापित करण्याची तरतूद केलेली आहे जसे की, संक्रमण क्षेत्रासाठी नगर पंचायत, छोटया नागरी क्षेत्रासाठी नगर परिषद आणि मोठया नागरी क्षेत्रासाठी महानगरपालिका | मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 मधील कलम 5, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 3 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 मधील कलम 3, 4, 5 आणि 341ए |
| 2 | अनुच्छेद 243आर | **नगरपालिकांची रचना:** ह्यात, राज्य शासनाने नगरपालिकेतील विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेल्या व्यक्तीच्या नामांकनाव्यतिरिक्त थेट निवडणुकांनी महानगरपालिकेतील सर्व जागा भरण्याची तरतूद केली आहे. ह्यात लोकसभा आणि राज्य विधानसभेचे सदस्य ज्यांचे मतदारसंघ नगरपालिका क्षेत्रात आहेत आणि नगरपालिका क्षेत्रातील राज्यसभेतील आणि राज्याच्या विधान परिषदेतील सदस्य जे नोंदणीकृत मतदार आहेत यांना प्रतिनिधित्व देण्याची सुद्धा तरतूद केलेली आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 मधील कलम 5(1), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 5 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 मधील कलम 9 आणि 341बी |

| अ.क्र. | भारताच्या संविधानातील तरतुदी | भारताच्या संविधानातील तरतुदींनुसार आवश्यकता | भारताच्या संविधानातील तरतुदींचे अनुपालन करणाऱ्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888/महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949/महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 आणि इतर अधिनियमातील तरतुदी |
|---|---|---|---|
| 3 | अनुच्छेद 243एस | **प्रभाग समितींचे गठन आणि रचना:** यामध्ये तीन लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या सर्व नगरपालिकांमध्ये प्रभाग समित्यांची रचना करण्याची तरतूद आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 मधील कलम 50टीटी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 29ए आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम 1965 मधील कलम 66ए |
| 4 | अनुच्छेद 243टी | **जागांचे आरक्षण:** यामध्ये अनुसूचित जाती/अनुसूचीत जमाती आणि महिलांना थेट निवडणुकीसाठी जागा राखून ठेवण्याची तरतूद आहे. त्यात राज्य विधानमंडळाद्वारे मागासवर्गीयांसाठी जागा आरक्षित करण्याची देखील तरतूद आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम 5ए, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 5ए, महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम मधील कलम 9(1ए), 9(2) आणि 341बी(4) |
| 5 | अनुच्छेद 243यु | **नगरपालिकांचा कालावधी:** यामध्ये नगरपालिकेच्या पहिल्या बैठकीच्या तारखेपासून पाच वर्षाच्या निश्चित कार्यकाळाची तरतूद केली आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम 6, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 मधील कलम 6 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 मधील कलम 40 |
| 6 | अनुच्छेद 243व्ही | **सदस्यत्वाची अपात्रता**: (i) जर एखादी व्यक्ती संबंधित राज्याच्या विधानमंडळाच्या निवडणुकीच्या उद्देशाने सध्या लागू असलेल्या कोणत्याही कायद्यांद्वारे किंवा कायद्यांअंतर्गत अपात्र ठरली असेल (ii) जर एखादी व्यक्ती राज्याच्या विधानमंडळाने बनवलेल्या कोणत्याही कायद्यांद्वारे किंवा कायद्यांतर्गत अपात्र ठरली असेल तर अश्या व्यक्तीला नगरपालिकेचा सदस्य म्हणून अपात्र ठरवण्याची तरतूद आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम 16, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 10 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम मधील कलम 16 आणि 44 |
| 7 | अनुच्छेद 243डब्ल्यू | **नगरपालिकांची शक्ति, प्राधिकार आणि दायित्व**: यामध्ये सर्व नगरपालिकांना स्वराज्य संस्था म्हणून कार्य करण्यासाठी आवश्यक अशा शक्ति व प्राधिकार राज्य शासनाद्वारे बहाल करण्याची तरतूद आहे. राज्य शासनाद्वारे सर्व नगरपालिकांना भारताच्या संविधानाच्या बाराव्या अनुसूची मध्ये सूचीबद्ध केलेल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी यथाशक्ति आणि अधिकार बहाल करण्याची सुद्धा तरतूद आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम चे प्रकरण IX ते XVI, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 63 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम मधील प्रकरण XI ते XXI |
| 8 | अनुच्छेद 243एक्स | **नगरपालिकेला कर लादण्याचा अधिकार आणि नगरपालिकेचे निधी:** यामध्ये राज्य विधानमंडळाद्वारे कर, आकार, शुल्क, इत्यादी आकारण्यासाठी आणि गोळा करण्यासाठी नगरपालिकांना प्राधिकृत करण्याची | मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम 139, प्रकरण VIII, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 82, 82 ए आणि 127 आणि महाराष्ट्र नगर |

| अ.क्र. | भारताच्या संविधानातील तरतुदी | भारताच्या संविधानातील तरतुदींनुसार आवश्यकता | भारताच्या संविधानातील तरतुदींचे अनुपालन करणाऱ्या मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888/महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949/महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 आणि इतर अधिनियमातील तरतुदी |
|---|---|---|---|
| | | तरतूद आहे. तसेच, राज्याच्या एकत्रीकृत निधीतून अनुदान देण्याची आणि नगरपालिकांना किंवा त्यांच्या वतीने मिळालेले सर्व पैसे जमा करण्यासाठी आणि अशा निधीतून पैसे काढण्यासाठी निधीची स्थापना करण्याची तरतूद आहे. | परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम मधील प्रकरण IX आणि X |
| 9 | अनुच्छेद 243आय सहित अनुच्छेद 243वाय | **वित्त आयोग:** यामध्ये राज्य वित्त आयोगाद्वारे नगरपालिकांच्या आर्थिक स्थितीचे पुनर्विलोकन व (i) नगरपालिकांची आर्थिक स्थिती सुधारणा, (ii) राज्य आणि नागरी स्थानिक संस्थांदरम्यान कर, शुल्क, जकात (टोल) आणि फी वितरणाचे नियमन करणारी तत्वे (iii) राज्याच्या एकत्रीकृत निधीतून सहाय्यक अनुदान शिफारस करण्याची तरतूद आहे. | महाराष्ट्र वित्त आयोग (संकीर्ण) अधिनियम, 1994 |
| 10 | अनुच्छेद 243झेड | **नगरपालिकांच्या लेख्यांची लेखापरीक्षा:** यामध्ये नगरपालिकांद्वारे लेखे ठेवण्याची आणि अशा लेख्यांची लेखापरीक्षा करण्याची तरतूद आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम 135 आणि 138, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम 93 आणि 105 आणि महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम मधील कलम 104 |
| 11 | अनुच्छेद 243के सहित अनुच्छेद 243 झेडए | **नगरपालिकांच्या निवडणुका:** यामध्ये राज्य निवडणूक आयोगाद्वारे मतदार यादींचे अधीक्षण, निर्देश आणि नियंत्रण आणि नगरपालिकांच्या सर्व निवडणुकांचे आयोजन करण्याची तरतूद आहे. | मुंबई महानगरपालिका अधिनियम मधील कलम 18 ए, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, मधील कलम 14 आणि नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, मधील कलम 10ए |
| 12 | अनुच्छेद 243 झेडडी | **जिल्हा नियोजनाकरिता समिति:** यामध्ये जिल्हा स्तरावर जिल्हा नियोजन समितीचे गठन, तिची रचना इ. ची तरतूद आहे. | महाराष्ट्र जिल्हा नियोजन समिति (स्थापना आणि कार्य) अधिनियम, 1998 |
| 13 | अनुच्छेद 243झेडई | **महानगर नियोजनाकरिता समिति:** 10 लाख किंवा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या प्रत्येक महानगर क्षेत्रात महानगर नियोजन समिती स्थापन करण्याची तरतूद आहे. | महाराष्ट्र महानगर नियोजन समिति (स्थापना आणि कार्य)(तरतुदींचे सातत्य) अधिनियम, 1999 |

*स्रोतः संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 आणि राज्य अधिनियम*

लेखापरीक्षेला असे आढळून आले की राज्य विधीविधान हे संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 मधील तरतुदींचे अनुपालन करते. तथापि, जोपर्यंत नागरी स्थानिक संस्थांकडे सुस्थिर संस्थात्मक व्यवस्था, पुरेसा निधी आणि कार्यकारी त्यांच्यावर सोपवलेली कार्ये पार पाडत नाही आणि नागरिकांना परिणामकारकरित्या सेवा देत नाहीत तोपर्यंत केवळ कायद्यांद्वारे संविधानाच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी प्रभावी विकेंद्रीकरणाची हमी देत नाही. या मुद्द्यांवर पुढील प्रकरणांत चर्चा केली आहे.